जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा मान्यता

पोआर,

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- २.२.९४

Sent Sai English Medium
Primary School, Adinathnagar,
Bhosari, Pune-411 039

प्रति,

अध्यक्ष,

ईश्वर एज्युकेशन सोसायटी, भोसरी.

---

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-१०९३/[७१४०]/प्राशि-३ दि. २०/१२/९३ व क्र. व्हीएलएस-१०९३/[७१३२]प्राशि ३ दि. २०/१/९४

वरील विषयाचे संदर्भाधीन शासनाकडील संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या --भोसरी------------------या ठिकाणावरील खाजगी प्राथमिक शाळेस ~~मराठी~~/इंग्रजी माध्यमातून सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यास्तव शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणेबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास सादर करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

..२..

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखादी [illegible]

काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रू. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार, शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था उघडणार नाही असे संस्थेने रू. १०/- च्या स्टॅंप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातून शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रू. १०/- च्या स्टॅंप पेपरवर द्यावी.

१३] इंग्जी माध्यमातून परवानगी द्यावयाच्या शाळांच्या संस्थांनी रू. २५,०००/- [रूपये पंचवीस हजार फक्त] अनामत रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल. तरी त्याबाबतचे प्रथमतः हमीपत्र देण्यात यावे. ही रक्कम परवानगीचे पत्र मिळालेनंतर दोन आठवड्यात शासनाकडे जमा करावयाची आहे.

वरील अटींची पूर्तता होत असलेबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ] जि. प./प्रशासन अधिकारी न. पा. शि. मं यांचेकडे त्वरित सादर करावी म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-

१. शिक्षणाधिकारी [प्राथ.] जि. प. पुणे विभाग
२. प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. पुणे विभाग, यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.